नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २६९ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार दि. १२ सेप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## कच्च्या तेलाच्या दरवाढीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम; महागाई वाढण्याची आणि रुपया कमजोर होण्याची शक्यता



**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**

पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत प्रचंड वाढ झाली असून, ब्रेंट क्रूड प्रति बॅरल ११० डॉलरच्या तर वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट (डब्ल्यूटीआय) क्रूड १०५ डॉलर प्रति बॅरलच्या जवळ पोहोचले आहे. भारताच्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के कच्चे तेल आयात केले जात असल्यामुळे, या दरवाढीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे महागाई वाढण्यासह रुपयावर मोठा दबाव आला आहे.

**रुपयात विक्रमी घसरण आणि परकीय चलन साठ्यावरील ताण**

टीएनव्ही फायनान्शियल सर्व्हिसेसचे सीईओ तारकेश्वर नाथ वैष्णव यांच्या मते, कच्चे तेल महाग झाल्यामुळे भारतीय तेल कंपन्यांना डॉलरची मागणी वाढवावी लागली आहे. यामुळे डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया विक्रमी घसरणीसह ९५.८० रुपयांच्या पातळीवर पोहोचला आहे. भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) बाजारात डॉलर पुरवठा करून रुपयाला सावरण्याचा प्रयत्न करत असली, तरी क्रूडच्या किमती याच पातळीवर राहिल्यास देशाच्या परकीय चलन साठ्यावर मोठा ताण येऊ शकतो.

# पुण्यात गणेशोत्सवासाठी प्रशासन सज्ज; वाहतूक, सुरक्षा आणि स्वच्छतेवर विशेष भर

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून तयारीचा आढावा; गर्दीच्या ठिकाणी २४ तास पोलिसांचा बंदोबस्त

**पुणे (समर्थ गांवकरी)**

पुण्यातील गणेशोत्सवासाठी देशभरातून मोठ्या संख्येने नागरिक येत असल्याने वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता, वीजपुरवठा आणि गर्दी व्यवस्थापनाची यंत्रणा अधिक सक्षम ठेवण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी प्रशासनाला दिले. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नातून यंदाचा गणेशोत्सव सुरक्षित, शिस्तबद्ध आणि आनंददायी वातावरणात साजरा करूया, असे आवाहनही त्यांनी केले.

विभागीय आयुक्त कार्यालयात गणेशोत्सवाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. शीतल तेली-उगले, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आणि पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

**गर्दीच्या काळात अतिरिक्त यंत्रणा तैनात करा**

गणेशोत्सवासाठी रेल्वे, बस आणि सार्वजनिक वाहतुकीतून मोठ्या संख्येने नागरिक पुण्यात येतात. त्यामुळे प्रत्येक रेल्वेगाडीनंतर होणारी गर्दी लक्षात घेऊन संबंधित दिवशी आणि गर्दीच्या वेळेनुसार अतिरिक्त मनुष्यबळ व वाहतूक यंत्रणा उपलब्ध ठेवण्याच्या सूचना सुनेत्रा पवार यांनी दिल्या. विविध गणेश मंडळांच्या सांस्कृतिक आणि अन्य कार्यक्रमांना हजारो नागरिक उपस्थित राहतात. त्यामुळे अशा ठिकाणी स्वतंत्र वाहतूक व गर्दी व्यवस्थापन करावे. वाहतूक बदल, पर्यायी मार्ग, पार्किंग व्यवस्था आणि गर्दीच्या ठिकाणांची माहिती नागरिकांना वेळेत देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

**२४ तास पोलिसांचा बंदोबस्त**

गणेशोत्सव हा पुण्याच्या सांस्कृतिक वैभवाचा महत्त्वाचा उत्सव असल्याने महिला, बालके आणि सर्वसामान्य नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले. गर्दीच्या ठिकाणी मंगळसूत्र चोरी, पाकीटमारी



यांसारख्या घटना रोखण्यासाठी २४ तास पोलिसांची गस्त आणि प्रभावी बंदोबस्त ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

मागील वर्षीच्या अनुभवातून आलेल्या अडचणींचा आढावा घेऊन यंदा आवश्यक सुधारणा कराव्यात आणि सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असेही सुनेत्रा पवार यांनी सांगितले.

## संक्षिप्त

### भातसा तलावात ९७.४० टक्के पाणीसाठा, सध्याची परिस्थिती काय?

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

मुंबईकरांच्या दृष्टीने महत्त्वाची बातमी आहे. मुंबईला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या सातही प्रमुख जलाशयांमध्ये पाणी साठा भरलेला आहे. शुक्रवार ११ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत जलाशयांमध्ये एकूण १३,९५,३३१ दशलक्ष लीटर पाणी जमा आहे. अर्थातच ९६.४१ टक्के पाणी साठा सध्याच्या घडीला सातही जलाशयांमध्ये उपलब्ध आहे. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पाणी साठा थोडा कमी आहे. २०२५ मध्ये याच दिवशी १४,०५,४३७ दशलक्ष लिटर म्हणजेच ९८.१८ टक्के, तर २०२४ मध्ये १४,१९,२७६ दशलक्ष लिटर म्हणजे ९८.०६ टक्के पाणीसाठा होता.

### ठाण्यात प्लास्टिकविरोधात महापालिकेची धडक कारवाई!

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

ठाणे शहरात प्रतिबंधित प्लास्टिकविरोधात ठाणे महापालिकेने धडक कारवाई सुरू केली आहे. शहरातील विविध भागांमध्ये करण्यात आलेल्या तपासणी मोहिमेदरम्यान मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईत सुमारे ९९ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले असून, तब्बल ७९ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

### सागरी विकासात महाराष्ट्र जगाचे नेतृत्व करणार!

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

जागतिक पातळीवर सागरी उद्योग झपाट्याने विस्तारत असताना भारतासह महाराष्ट्राने या क्षेत्रात नुसते सहभागी न होता नेतृत्व करण्याच्या दिशेने वाटचाल करावी, अशी राज्य सरकारची भूमिका असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी शुक्रवारी स्पष्ट केले. बंदरे, मालवाहतूक, जहाजबांधणी, जहाज पुनर्वापर, जहाजदुरुस्ती आणि जलवाहतूक या सर्व क्षेत्रांत गुंतवणूकदारांना अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी राज्य सरकार धोरणात्मक पावले उचलत असून, महाराष्ट्र हे सागरी उद्योगासाठी 'योग्य ठिकाण' ठरावे, यासाठी शासनाची यंत्रणा काम करत असल्याचे राणे यांनी सांगितले.

### राज्यावर दुष्काळाचे सावट ! - कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

**पुढील ३-४ दिवसांत अहवालानंतर कार्यवाही करणार**

**पुणे (समर्थ गांवकरी)**

राज्यातील अनेक भागांत पावसाने ओढ दिल्याने पिके संकटात सापडली असून, दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी पेरलेली पिके जळण्याच्या अवस्थेत आहेत. राज्यातील परिस्थितीचा अहवाल पुढील तीन-चार दिवसांत प्राप्त झाल्यानंतर सरकार योग्य तो निर्णय घेईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शुक्रवारी दिली. तसेच कमी पाऊस झालेल्या भागांचा आपण पुढील आठवड्यापासून दौरा करणार असल्याचेही भरणे यांनी सांगितले

### कर्जमुक्तीसाठी ३ लाख ५५ हजार ६१४ शेतकऱ्यांची दुसरी यादी जाहीर

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची दुसरी यादी शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात आली. या यादीत एकूण ३ लाख ५५ हजार ६१४ शेतकऱ्यांचा समावेश आहे. पात्र शेतकऱ्यांनी यादीतील आपले नाव तपासून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले आहे. ही यादी जिल्हानिहाय आणि बँकनिहाय प्रसिद्ध करण्यात आली असून, ती संबंधित बँक शाखा, विकास संस्था तसेच ग्रामपंचायतींमध्येही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## बँक ग्राहकांसाठी महत्त्वाची बातमी; आजपासून सलग सुट्ट्या, अनेक राज्यांत बँका काही दिवस बंद राहणार

**नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)**




बँकेत महत्त्वाचं काम असेल तर ग्राहकांना काही दिवस प्रतीक्षा करावी लागू शकते. बँक कर्मचारी संघटनांनी देशव्यापी एकदिवसीय संपाची हाक दिल्यामुळे आज बँकांच्या नियमित कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे. यानंतर १२ सप्टेंबरला शनिवार आणि १३ सप्टेंबरला रविवार असल्याने बँकांना नियमित सुट्टी असेल. त्यातच काही राज्यांमध्ये गणेश चतुर्थीनिमित्त पुढील दिवसांनाही बँका बंद राहणार आहेत.

युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स (UFBU) कडून बँकिंग क्षेत्राशी संबंधित विविध मागण्यांसाठी हा संप पुकारण्यात आला आहे. बँक कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी म्हणजे आठवड्यातील कामकाज केवळ ५ दिवसांचे असावे. म्हणजेच शनिवार आणि रविवार या दोन्ही दिवशी बँकांना पूर्ण सुट्टी देण्यात यावी, अशी मागणी संघटनांकडून करण्यात आली आहे. याशिवाय कामगिरीवर आधारित प्रोत्साहन योजनेचा आढावा घेऊन त्यातील त्रुटी दूर कराव्यात, पेन्शनमध्ये करण्यात आलेल्या सुधारणांची अंमलबजावणी करावी आणि कर्मचाऱ्यांच्या आरोग्य विम्याशी संबंधित तरतुदी लागू कराव्यात, अशा मागण्या बँक कर्मचारी संघटनांनी केल्या आहेत. मागण्या मान्य न झाल्यास २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान ३ दिवसांचा देशव्यापी संप पुकारण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यानंतरही प्रश्न सुटला नाही तर २६ ऑक्टोबर २०२६ पासून बेमुदत संप सुरू करण्याचा इशाराही संघटनांनी दिला आहे.

## जिल्हा परिषद शाळांमध्ये 'राज्य महोत्सव' गणेशोत्सवाच्या अनुषंगाने विविध उपक्रमांचे आयोजन

### शाडू मातीच्या गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेसह निबंध, वक्तृत्व व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन



**ठाणे (समर्थ गांवकरी)**

राज्याच्या वैविध्यपूर्ण सांस्कृतिक परंपरेत गणेशोत्सवाला विशेष महत्त्व असून, राज्याची सांस्कृतिक ओळख देश-विदेशात निर्माण करणारा हा लोकप्रिय उत्सव आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यटन, विविध उद्योग व व्यवसायांना चालना मिळत असून सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक अभिसरणासही हातभार लागतो. ही परंपरा व संस्कृती जतन व वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुषंगाने जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत सर्व शाळांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

याबाबत जिल्हा परिषद अंतर्गत सर्व शाळांना गणेशोत्सवापूर्वी शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याच्या कार्यशाळांचे आयोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्व समजावून देतानाच पारंपरिक कला व संस्कृतीची ओळख करून देण्यात येणार आहे.

तसेच विद्यार्थ्यांमध्ये गणेशोत्सवाच्या इतिहासाबाबत माहिती, सामाजिक भान, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने निबंध लेखन, वक्तृत्व स्पर्धा तसेच विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन गणेशोत्सवाच्या सांस्कृतिक व सामाजिक पैलूंचा अभ्यास करावा, यासाठी शाळास्तरावर आवश्यक मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी सांगितले की, कला, संस्कृती, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा उत्सव म्हणून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. शालेय विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

## साईचरणी पुण्याच्या भक्ताकडून १२ लाखांचा सुवर्ण मुकुट अर्पण!

**शिर्डी (समर्थ गांवकरी)**

श्री साईबाबांवर देश-विदेशातील लाखो भाविकांची अढळ श्रद्धा आहे. भक्तांकडून साईचरणी विविध प्रकारचे दान अर्पण केले जाते. याच भक्तिभावातून पुणे येथील साईभक्त श्री. विकास ताराचंद चोपकर यांनी दि. १० सप्टेंबर २०२६ रोजी श्री साईबाबांच्या चरणी आकर्षक नक्षीकाम असलेला सुवर्ण मुकुट अर्पण केला.

या सुवर्ण मुकुटाचे वजन ९० ग्रॅम ९७० मिलीग्रॅम असून, त्याची देणगी किंमत सुमारे १२ लाख ८२ हजार ४९५ रुपये आहे. भाविकांच्या श्रद्धा आणि भक्तीचे हे अनमोल प्रतीक मानले जात आहे. चोपकर यांनी भक्तिभावाने हा सुवर्ण मुकुट



साईबाबांच्या चरणी अर्पण केला.

यावेळी श्री साईबाबा संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दानशूर साईभक्त श्री. विकास ताराचंद चोपकर यांचा सत्कार केला. श्रद्धेने अर्पण केलेल्या या मौल्यवान देणगीबद्दल संस्थानच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

# गणेश उत्सवानिमित्त थोरात कारखान्यावर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या अमृत सांस्कृतिक मंडळाच्या वतीने गणेशोत्सव काळामध्ये कारखाना कार्यस्थळावर १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या काळात विविध दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती उपाध्यक्ष कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर व कार्याध्यक्ष रामदास तांबडे यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या प्रेरणेतून अमृत सांस्कृतिक मंडळाच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सव काळामध्ये कारखाना कार्यस्थळावर विविध दर्जेदार कार्यक्रम होत असतात. यावर्षी सोमवार दिनांक १४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी नऊ वाजता श्री गणेशाची स्थापना होणार आहे. याचबरोबर बुधवारी १६ सप्टेंबर रोजी रात्री ८.३० वाजता मराठी चित्रपट सृष्टीतील अभिनेते संतोष पवार,



विनय येडेकर, आनंदा कारेकर,सानिका शिंदे,सोनाली मगर,आदित्य गटे,संकेत बीवलकर यांच्या उपस्थितीत ए भाऊ डोकं नको खाऊ हे विनोदी नाटक होणार आहे. तर गुरुवारी १७ सप्टेंबर रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत रांगोळी व मेहंदी स्पर्धा. शनिवारी १९ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ८.३० वाजता महाराष्ट्रातील प्रसिद्ध नाटक व सिने अभिनेते संजय नार्वेकर विजय पटवर्धन यांच्या उपस्थितीत भ्रमाचा भोपळा हे होणार आहे. सोमवार २१ सप्टेंबर रोजी सत्यनारायण महापूजा व रात्री अमृतेश्वर भजनी मंडळाचे भजन होणार आहे. मंगळवारी २२ सप्टेंबर रोजी रात्री ८.३० वाजता ऑर्केस्ट्रा रंगतरंग हा होणार आहे तर बुधवारी २३ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता संगीत खुर्ची व चमचा लिंबू होणार आहे. गुरुवारी २४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता राहणे प्रस्तुत खेळ पैठणीचा हा लय भारी संगमनेरी हा कार्यक्रम होणार आहे. शुक्रवारी २५ सप्टेंबर रोजी साडेनऊ वाजता श्रींची मिरवणूक व विसर्जन होणार आहे.

या कार्यक्रमासाठी काँग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात, मा.आ.डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे,डॉ. जयश्रीताई थोरात,कारखान्याचे उपाध्यक्ष पांडुरंग पाटील घुले सर्व संचालक उपस्थित राहणार आहेत.

तरी या गणेश मंडळाच्या सर्व कार्यक्रमांसाठी अमृतनगर,घुलेवाडी,मालदाड,वेल्हाळे, गुंजाळवाडी,सुकेवाडी,संगमनेर व परिसरातील सर्व नागरिक महिला व युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन उपाध्यक्ष जगन्नाथ घुगरकर, कार्याध्यक्ष रामदास तांबडे,खजिनदार भारत देशमुख,सेक्रेटरी संदीप दिघे,कारखान्याचे सेक्रेटरी किरण कानवडे,संचालक कृष्णा दिघे, अनिल पाटोळे, बबन सावंत,संजय मांडे,शिवाजी वाणी,विनायक जोंधळे, अजित मोकळ, राजू बड आदींसह विविध पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



# पवित्र पोर्टलद्वारे जिल्हा परिषदेत नवीन १८२ शिक्षकांची भरती प्रक्रिया पूर्ण

## मराठी व उर्दू माध्यमातील पात्र शिक्षकांना तालुकानिहाय समुपदेशनातून पदस्थापना

ठाणे (समर्थ गांवकरी)

पवित्र पोर्टलमार्फत करण्यात आलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेअंतर्गत शिफारस झालेल्या उमेदवारांचे समुपदेशन व पदस्थापना प्रक्रिया आज, दि. ११ सप्टेंबर, २०२६ रोजी बी. जे. हायस्कूल येथे पार पडली. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाने पारदर्शक पद्धतीने समुपदेशनाद्वारे पात्र शिक्षकांना उपलब्ध रिक्त पदांनुसार तालुकानिहाय पदस्थापना देण्यात आली.

पवित्र पोर्टलच्या जाहिरातीत मराठी माध्यमासाठी ४९९ तर उर्दू माध्यमासाठी २७ पदे प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार मराठी माध्यमात इयत्ता पहिली ते पाचवी सर्व विषयांसाठी ८६ शिफारसींपैकी ७७ उमेदवार पात्र, इयत्ता सहावी ते आठवी विज्ञान-गणित विषयासाठी ८० शिफारसींपैकी ७३ पात्र, तर इयत्ता सहावी ते आठवी भाषा विषयासाठी २५ शिफारसींपैकी २१ पात्र ठरले आहेत. अशा प्रकारे मराठी माध्यमासाठी एकूण १९१ शिफारसी असून १७१ उमेदवार पात्र ठरले.

उर्दू माध्यमात इयत्ता पहिली ते पाचवी सर्व विषयांसाठी ४ शिफारसी व ४ पात्र, इयत्ता सहावी ते आठवी विज्ञान-गणितासाठी ६ शिफारसी व ६ पात्र, तर इयत्ता सहावी ते आठवी भाषा विषयासाठी १ शिफारस व १ पात्र उमेदवार आहे. उर्दू माध्यमासाठी एकूण ११ शिफारसी असून सर्व ११ उमेदवार पात्र ठरले आहेत. एकूण शिफारसी २०२ असून त्यापैकी १८२ उमेदवार पात्र ठरले आहेत. ११ उमेदवारांच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्या असून ९ उमेदवार गैरहजर होते.

पदस्थापनेनुसार मराठी माध्यमातील शिक्षकांना अंबरनाथ ३६, भिवंडी ३९, कल्याण ३६, शहापूर १५ आणि मुरबाड ३५ या तालुक्यांमध्ये पदस्थापना देण्यात आली. यापैकी २३ शिक्षकांना पेसा क्षेत्रात तर १४८ शिक्षकांना नॉन-पेसा क्षेत्रात समुपदेशनाद्वारे पदस्थापना देण्यात आली. उर्दू माध्यमातील अंबरनाथ ३, कल्याण ४, शहापूर १ आणि



भिवंडी ३, अशा एकूण ११ शिक्षकांना नॉन-पेसा क्षेत्रात पदस्थापना देण्यात आली.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, शिक्षणाधिकारी प्राथमिक बाळासाहेब राक्षे, भिवंडी, मुरबाड व शहापूर तालुक्यांचे गटशिक्षणाधिकारी, सहाय्यक प्रशासन अधिकारी (शिक्षण) योगिता धीवर, सहाय्यक प्रशासन अधिकारी (सामान्य प्रशासन) नितीन घोडके, विस्तार अधिकारी शिक्षण आशिष झुंजारराव तसेच शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरती प्रक्रियेत पारदर्शकता राखत पात्र उमेदवारांना समुपदेशनाद्वारे उपलब्ध पदांवर पदस्थापना देण्यात आली. समुपदेशन प्रक्रिया पारदर्शक पार पाडल्याने उपस्थित उमेदवारांनी समाधान व्यक्त केले.

# नगर शहरात जमीन बळकावून अवाजवी व्याजाची मागणी; अवैध सावकारी करणारे दोघे जेरबंद

## तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

तारण ठेवलेली जमीन परत न करता अवाजवी व्याजाची मागणी करून मानसिक त्रास दिल्याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे.

सुरेश मोतीलाल कांकरिया (वय ६४, रा. विराज कॉलनी, तारकपूर) आणि विनय गुरुलिंग होनराव (वय ५५, रा. होनराव वाडा, डावरे गल्ली, अहिल्यानगर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

फिर्यादी दत्तात्रय जगन्नाथ आगरकर (वय ७७, रा. आगरकर मळा, रेल्वे स्टेशन शेजारी) यांनी सन २०१६ पासून वेळोवेळी स्वतःची जमीन तारण ठेवून कांकरिया यांच्याकडून २ कोटी रुपये व्याजाने घेतले होते. फिर्यादीने आतापर्यंत ३ कोटी ७५ लाख रुपये मुद्दल व व्याजापोटी परत केले. तरीही आरोपींनी तारण जमीन परत न करता फसवणूक करत अवैधरीत्या व्याजावर व्याज लावून तब्बल १८ कोटी ३८ लाख १४ हजार ६९५ रुपयांची मागणी करून मानसिक त्रास दिल्याचा आरोप आहे.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गु.र.नं. ७७९/२०२६ अन्वये बीएनएस कलम ३०८(२)(३)(४)(५), ३१८(४), ३५१(२)(३), ३(५) सह महाराष्ट्र सावकारी अधिनियम ३१, ३९, ४४, ४५, ४८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशावरून पो.नि. संतोष मुटकुळे यांनी अंमलदार संदीप पवार, विजय ठोंबरे, सतीश भवर, महिला अंमलदार किरण ठुबे यांचे पथक नेमले होते. दि. ७ सप्टेंबर रोजी तारकपूर परिसरात शोध घेऊन दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांना पुढील तपासासाठी तोफखाना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास तोफखाना पोलीस करीत आहेत.

# हाळगाव कृषी महाविद्यालयातील वसतिगृहात विद्यार्थ्याला मारहाण; रॅगिंगप्रकरणी चौघांसह अनोळखी विद्यार्थ्यांवर गुन्हा

जामखेड (समर्थ गांवकरी)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषी महाविद्यालय, हाळगाव (ता. जामखेड) येथील वसतिगृहात विद्यार्थ्याला रॅगिंग करून मारहाण केल्याप्रकरणी चौघांसह काही अनोळखी विद्यार्थ्यांविरुद्ध जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी वेदांत दगडू तळुले (वय १८, रा. निमगाव घाना, पोस्ट भाळवणी, ता. जि. अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार ऋतीक दत्तात्रय शेळके, पियुष कुंभार, सुशील हेमंत मालकाने, प्रतिक कुमार वाघमोडे (पूर्ण नाव व पत्ता माहीत नाही) तसेच काही अनोळखी विद्यार्थ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास तसेच दि. ८ सप्टेंबर



रोजी रात्री १२.१५ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी आपल्या खोलीत झोपलेला असताना आरोपींनी खोलीच्या दरवाजाची कडी तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर काही आरोपींनी लाकडी काठीने हात, पाठ व पोटावर मारहाण केली, तर काहींनी लाथाबुक्क्यांनी डोक्यात व बरगड्यांवर मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. फिर्यादीने आरडाओरड करण्यास सुरुवात केल्यानंतर आरोपींनी रेक्टर कुलकर्णी यांना फोन करून आमची तक्रार का केली, असा जाब विचारत शिवीगाळ केली. तसेच, कॉलेजमध्ये शिक्षण घ्यायचे असेल तर आम्ही सांगू तसे वागावे व राहावे लागेल, अशी दमदाटी केल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ६३०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), १८९(२), १९१(२), १९१(३), १९० तसेच महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध कायदा १९९९ मधील कलम ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी करीत असून, पोलीस हेड कॉन्स्टेबल टी. बी. सोनवणे यांनी गुन्हा दाखल केला. घटनास्थळी पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, पोहेकॉ टी. बी. सोनवणे व पोहेकॉ एस. डी. लोखंडे यांनी भेट दिली.

# किनवट शहर व परिसरात पोळा सण दुष्काळाच्या छायेत साजरा

## बैलांच्या अंगावर सजावटीचा साज; मात्र शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंतेच्या रेषा

किनवट (समर्थ गांवकरी)

शेतकऱ्यांच्या जीवनातील कष्टकरी सोबती असलेल्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा पोळा सण किनवट शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात मोठ्या उत्साहात, मात्र यंदा दुष्काळाच्या सावटाखाली साजरा करण्यात आला. बैलांना सजवून, त्यांची पूजा करून शेतकऱ्यांनी परंपरा जपली; परंतु पावसाने ओढ दिल्याने शेतातील उभ्या पिकांची चिंता आणि पुढील दिवसांचे प्रश्न त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. पोळ्यानिमित्त बैलांना स्वच्छ अंघोळ घालून त्यांच्या शिंगांना रंगरंगोटी करण्यात आली. अंगावर झूल, गोंडे, घुंगरू आणि विविध प्रकारच्या सजावटीच्या वस्तूंनी बैलांचा साज करण्यात आला. घरातील महिलांनी औक्षण करून बैलांची पूजा केली. पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून त्यांच्या चरणी नतमस्तक होत शेतकऱ्यांनी वर्षभर शेतात राबणाऱ्या या मुक्या जीवांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. मात्र, पोळ्याचा उत्सव साजरा होत असताना यंदाच्या दुष्काळाचे वास्तव अधिक प्रकर्षाने जाणवत होते. पावसाअभावी अनेक भागांत पिकांची वाढ खुंटली असून सोयाबीन, कापूस, तूर आणि इतर पिकांवर संकटाचे सावट आहे. चाऱ्याचा प्रश्नही



गंभीर होत चालला आहे. त्यामुळे आपल्या बैलांना सजवताना एका हातात सणाचा आनंद आणि दुसऱ्या हातात त्यांच्या चाऱ्याची चिंता, अशी शेतकऱ्यांची अवस्था पाहायला मिळाली. ज्या बैलांच्या ताकदीवर शेतकरी काळ्या मातीत घाम गाळतो, त्याच बैलांच्या डोळ्यांतही यंदा दुष्काळाचे प्रतिबिंब दिसत होते. शेतकऱ्याच्या सुख-दुःखाचा साक्षीदार असलेला बैल वर्षभर न थकता शेतात राबतो. पेरणीपासून मशागतीपर्यंत आणि शेतीच्या विविध कामांमध्ये शेतकऱ्याचा खरा साथीदार ठरतो. म्हणूनच पोळा हा केवळ सण नसून शेतकरी आणि त्याच्या पशुधनातील जिव्हाळ्याच्या नात्याचा उत्सव आहे. यंदा मात्र सजलेल्या बैलांच्या गळ्यातील घुंगरांचा आवाज आणि पावसासाठी आकाशाकडे लागलेल्या शेतकऱ्यांच्या नजरा, हे विरोधाभासाचे चित्र किनवट परिसरात पाहायला मिळाले. बैलांच्या अंगावर रंगांची उधळण होती; पण शेतकऱ्यांच्या मनावर दुष्काळाची काळी छाया होती.तरीही संकट कितीही मोठे असले तरी परंपरा आणि आपल्या कष्टकरी साथीदारांवरील प्रेम सोडायचे नाही, या भावनेने शेतकऱ्यांनी पोळा साजरा केला. बैल सुखी राहो, शेत हिरवेगार होवो आणि आभाळ भरून बरसो, अशी मनोमन प्रार्थना करत शेतकऱ्यांनी यंदाच्या पोळ्याला आपल्या लाडक्या बैलांचे औक्षण केले.

# घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ ची ठाणे जिल्ह्यात काटेकोरपणे अंमलबजावणी सुरू

### अनधिकृत कचरा टाकण्यास प्रतिबंध; ग्रामपंचायत स्तरावर प्रभावी कार्यवाही करण्याचे निर्देश

ठाणे (समर्थ गांवकरी)

केंद्र शासनाने पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ अधिसूचित केले असून, त्यानुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अधिक्रमित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यात घनकचऱ्याचे योग्य वर्गीकरण, संकलन, वाहतूक, व्यवस्थापन व विल्हेवाट याबाबत घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ५ मे २०२६ रोजी इहेरिश्र चींपळलळरिश्र ऊीरिींळेप विरुद्ध ऊी. डींलहरीह उहरपवीर झरपवशू जी. या प्रकरणात दिलेल्या आदेशानुसार घनकचरा व्यवस्थापन नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांकडून विविध ठिकाणांची पाहणी करण्यात आली आहे.

या पाहणीदरम्यान शहापूर, मुरबाड,







भिवंडी, अंबरनाथ आणि कल्याण तालुक्यातील विविध ग्रामपंचायत क्षेत्रांमध्ये मोकळ्या जागेत घनकचरा टाकला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. रस्त्यांच्या कडेला, महामार्गावरील उड्डाणपुलांजवळ, नदी परिसर, बसथांबे तसेच इतर सार्वजनिक ठिकाणी होणारे अनधिकृत कचरा टाकणे रोखण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

# अहिल्यानगर पेट्रोल पंप डीलरशिपचे आमिष दाखवून ८४ लाखांची फसवणूक; दोघे जेरबंद

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

जिओ कंपनीची पेट्रोल पंप डीलरशिप व परवाना मिळवून देतो, असे आमिष दाखवून तब्बल ८४ लाख ५३ हजार रुपयांचा गंडा घालणाऱ्या दोन सायबर ठगांना सायबर पोलीस ठाण्याच्या पथकाने उत्तर प्रदेशातील बांदा जिल्ह्यातून ताब्यात घेतले आहे.

दि. ३१ ऑक्टोबर २०२५ ते ८ जुलै २०२६ या कालावधीत मोबाईल क्र. ८३८२०१११८६ धारक सौरभ अग्रवाल (पूर्ण नाव, पत्ता माहित नाही) याने तक्रारदाराला जिओ पेट्रोल पंपाची डीलरशिप मिळवून देण्याचे आमिष दाखविले. त्यानंतर वेगवेगळी प्रोसेसिंग फी व इतर कारणे सांगून तक्रारदाराकडून ८४,५३,००० रुपये उकळून फसवणूक केली. या तक्रारीवरून सायबर पोलीस ठाण्यात मोबाईल धारक सौरभ अग्रवाल, शिंदे इंजिनिअर व संबंधित बँक खातेधारक यांच्याविरुद्ध गु.र.नं. २५/२०२६ अन्वये बीएनएस कलम ३१८(४), ३१९(२) सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास करताना तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा माग काढला. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. सागर ढिकले यांच्या पथकातील सपोउपनि सुदाम काकडे, पोहेकॉ उमेश खेडकर, रावसाहेब दुसले आणि पोहेकॉ शैलेश गोमसाळे यांनी उत्तर प्रदेशातील बांदा जिल्ह्यात जाऊन बनावट नावाने खोली भाड्याने घेऊन राहणाऱ्या मुख्य सूत्रधाराचा शोध घेतला. त्यांनी कौशल्याने सापळा रचून दोन सायबर ठगांना मुद्देमालासह ताब्यात घेतले.

**ताब्यात घेतलेले आरोपी -**

१) आकाश सिंह पुत्र पुरण सिंह (वय ३३, रा. इमेलिया, ठाणा मुस्करा, तहसील मौदहा, जि. हमीरपूर, उत्तर प्रदेश) (टोपणनाव - सौरभ अग्रवाल)

२) निलेश कुमार द्विवेदी पुत्र सुरेश द्विवेदी (वय २९, रा. न्युरिया, ठाणा बिवार, तहसील मौदहा, जि. हमीरपूर, उत्तर प्रदेश)

हे दोन्ही आरोपी सराईत गुन्हेगार असून यापूर्वी पंजाब व गुजरात राज्यात त्यांच्याविरुद्ध अशाच स्वरूपाचे



फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत. दोन्ही आरोपींना आज रोजी न्यायालयात पोलीस कोठडी (रिमांड) कामी हजर करण्यात येत आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपविभागीय अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सागर एस. ढिकले, सपोउपनि सुदाम काकडे, पोहेकॉ उमेश खेडकर, रावसाहेब हुसळे, शैलेश गोमसाळे, रविंद्र कर्डिले, प्रशांत जाधव, आप्पा हिंगे आणि प्रशांत राठोड यांनी केली आहे.

# धांदरफळ बुद्रुक येथे उत्साहात पार पडला 'उत्सव बळीराजाचा'; बैलपोळ्यासोबत ट्रॅक्टर पोळा व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

## बैल पोळा व ट्रॅक्टर पोळा हा खऱ्या अर्थाने ग्राम उत्सव धांदफळकरांचा आहे : बाळासाहेब देशमाने

संगमनेर खुर्द(समर्थ गांवकरी)

शेती, माती आणि नाती टिकवणे अत्यंत गरजेचे आहे. आज ग्रामीण भागातील बळीराजा संपूर्ण जगाचा पोशिंदा असून वर्षभर केलेल्या कष्टांचे बक्षीस म्हणून तो बैलपोळ्याच्या दिवशी सर्जा-राजाचा सन्मान करतो. मालक नव्हे तर मित्र म्हणून त्याच्यासोबत राहण्याचा शब्द देऊन काळ्या आईच्या सेवेसाठी दोघेही कटिबद्ध असतात. या ऋणानुबंधातूनच समाजाला सकस व निरोगी धान्य मिळते. शेती सुधारण्यासाठी बळीराजा आपल्या नवीन युगातील मित्र म्हणजेच ट्रॅक्टरसोबत काम करत आहे. धांदरफळकरांचा हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात आदर्शवत असून हा खऱ्या अर्थाने धांदफळकरांचा ग्राम उत्सव आहे, असे प्रतिपादन स्वदेश सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब देशमाने यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील धांदरफळ बुद्रुक येथे गेल्या आठ वर्षांपासून पारंपरिक बैलपोळ्यासोबतच 'ट्रॅक्टर पोळा' हा अभिनव सण मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. आठ वर्षांपूर्वी बाजारात अवघ्या ४ ते ५ बैलजोड्या आल्याचे पाहून, पूर्वी १०० च्या आसपास असणाऱ्या बैलजोड्यांची जागा ट्रॅक्टरने घेतल्याचे उद्योजक बाळासाहेब देशमाने यांच्या लक्षात आले.

या पार्श्वभूमीवर त्यांनी बैलपोळ्यासोबत ट्रॅक्टर पोळा साजरा करण्याचा संकल्प केला. स्वदेश सामाजिक सेवाभावी संस्था, ग्रामपंचायत धांदरफळ बुद्रुक आणि समस्त ग्रामस्थ



यांच्या संयुक्त विद्यमाने 'उत्सव धांदरफळकरांचा, उत्सव बळीराजाचा' हा उपक्रम सुरू करण्यात आला.

या उत्सवात संत गोरोबा काका नगर येथील कलावंत सुनील वाकचौरे यांनी बनवलेल्या मातीच्या बैलाचे आणि मानाच्या बैलाचे पूजन करून, गावचे ग्रामदैवत श्री हनुमंत रायाचे दर्शन घेत उत्सवाची सुरुवात झाली.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग, कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र. १, नारायणगाव, ता.जुन्नर,जि.पुणे**

ई-मेल :- eekid1narayangaon@gmail.com दूरध्वनी क्र.०२५३-२५७८०१२.

### ई- निविदा सूचना क्र. ०४ सन २०२६-२७

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत (रु) |
|---|---|---|
| १ | कुकडी सिंचन शाखा, जवळा अंतर्गत को.प. बंधारा गुणोरे, म्हसे खुर्द, म्हसे बुद्रुक, ता. पारनेर व हिंगणी ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर को.प.बंधाऱ्याचे बर्गे बसविणे. | ९,७३,९३०/- |

१) ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक १७/०९/२०२६ ते २४/०९/२०२६
२) ई-निविदा उघडणे :- दिनांक २८/०९/२०२६ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे

जा.क्र.कुपावि-१/लेशा/निविदा/३३३१/२०२६
कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगाव,
ता. जुन्नर, जि. पुणे दि. ०८/०९/२०२६

**(जी. बी. नान्नोर)**
कार्यकारी अभियंता
कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगाव

**जिमाका/नगर/जाहि/९९७/२०२६**

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### महिलांनीच केले पार्थिव शिवलिंग पूजन

**महापौर ज्योती गाडे यांच्या हस्ते महाआरती**



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

विश्व मांगल्यच्या वतीने पार्थिव शिवलिंग पूजनाचा धार्मिक उपक्रम भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. विशेष म्हणजे या पूजेचे पौरोहित्य महिलांनीच केले. पारंपरिक धार्मिक विधींमध्ये महिलांचा वाढता सहभाग अधोरेखित करणारा हा उपक्रम ठरला.

यावेळी सौ. स्वाती पवळे, सौ. स्वाती सिरसूळ, सौ. सुरेखा जंगम, सौ. लीला अग्रवाल, सौ. कालिंदी केसकर आणि सौ. मयुरी जाधव यांनी पार्थिव शिवलिंगाची विधिवत पूजा-अर्चा केली. सौ. रेखा झंवर यांच्या मार्गदर्शनाखाली पूजेचे धार्मिक विधी श्रद्धा आणि भक्तिभावाने पार पडले. महापौर सौ. ज्योती गाडे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. महाआरतीच्या वेळी उपस्थित भाविकांनी हर हर महादेवचा जयघोष करत भक्तिभावाने सहभाग घेतला.

महिलांनीच पौरोहित्याची जबाबदारी स्वीकारल्याने उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले.या प्रसंगी श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप पांढरे यांची उपस्थिती होती. पूजन व महाआरतीनंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने महाप्रसादाचा लाभ घेतला.महिलांच्या सहभागातून धार्मिक परंपरा, संस्कार आणि महिला सक्षमीकरणाचा सुंदर संगम घडवून आणणारा हा उपक्रम भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला.

### नेप्तीत पाच हातभट्टी दारू अड्ड्यांवर छापा

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर (स.गांवकरी):- शहरालगतच्या नेप्ती गावात सुरू असलेल्या गावठी हातभट्टी दारूच्या अवैध धंद्यावर स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई केली. पोलिसांनी एकाच वेळी पाच ठिकाणी छापे टाकत ४१० लिटर गावठी हातभट्टी दारू आणि तब्बल ६,५०० लिटर कच्चे रसायन नष्ट केले.

या कारवाईत एकूण ३ लाख ६३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल असल्याचे पोलिसांनी सांगितले असून, ११ आरोपींविरुद्ध पाच स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ९ सप्टेंबर २०२६ रोजी या पथकाने अहिल्यानगर तालुका पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नेप्ती गावात गावठी हातभट्टी दारू तयार करून विक्री करणार्यांची माहिती घेतली.

त्यानंतर पथकाने पाच वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून कारवाई केली. पोलिसांनी ही सर्व दारू आणि हातभट्टी निर्मितीसाठी वापरण्यात येणारे कच्चे रसायन जागीच नष्ट केले.

या कारवाईत अजय चांगदेव पवार, सुनिल बाजीराव पवार, दिपक बबन नागपूरे, भारत माणिक पवार आणि शरद माणिक पवार यांच्यासह एकूण ११ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई सपोनि हरिष भोये, पोउपनि कृष्णकुमार सेदवाड तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांच्या पथकाने केली.

### प्रकल्प एअर फिशच्या प्रतिनिधींनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट



**नागपूर (समर्थ गांवकरी)**

एअर फिशच्या प्रतिनिधींनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन राज्यात एअर फिश निर्मिती व संचालन केंद्र सुरू करण्याबाबतचा प्रकल्प अहवाल सादर केला.

एअर फिशचे सिंगापूर येथील टॅन कोक ही युजिन व शिवांश मित्तल तसेच सिद्धार्थ शर्मा, अमोल खंते यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली, यावेळी अर्थ व नियोजन राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल उपस्थित होते.

एअर फिश फ्लाईंग बोट प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यात देखभाल, दुरुस्ती व पुनर्बांधणी (एमआरओ) तसेच विमाननिर्मिती व उत्पादन सुविधा विकसित करण्याच्या संधीचा शोध घेतला जात आहे. राज्यात विमान वाहतूक आणि आधुनिक जलवाहतूक तंत्रज्ञानाची सक्षम परिसंस्था इकोसिस्टीम उभारणे हा या प्रकल्पाचा उद्देश असल्याचे यावेळी शिवांश मित्तल यांनी सांगितले.

# गणेशोत्सवात नियमांचे पालन करा; लेझर, डीजेचा त्रास झाल्यास तत्काळ कारवाई : खेड तालुक्यात गणेशोत्सव पूर्वतयारी

**राजगुरुनगर (समर्थ गांवकरी)**

गणेशोत्सव पर्यावरणपूरक तसेच विसर्जन मिरवणूक शांततेत आणि ध्वनी प्रदूषण मुक्त कराव्यात असे आवाहन खेड विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांनी शहरातील सार्वजनिक गणपती मंडळे व नागरिकांना केले.

गणेशोत्सव २०२६ स्थानिक प्रशासन यांच्या वतीने गणेशोत्सव पूर्वतयारी बैठक येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात झाली.यावेळी पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण,नायब तहसीलदार चेतन मोरे, मुख्याधिकारी अंबादास गर्कळ, सहाय्यक गटविकास अधिकारी सुनील भोईर,वीज वितरण उत्तम मंचरे, सहाय्यक पोलिस निरीक्षक अभिजित कुदळे, पोलिस पाटील संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे, विजया शिंदे,नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ,हिरामण सातकर, बाळासाहेब सांडभोर, पोलिस पाटील संघटना खेड तालुका अध्यक्ष दीपक पावडे, ड मनिषा टाकळकर, संपदा सांडभोर, संगीता तनपुरे यांच्यासह तालुक्यातील राजगुरूनगर सह विविध गावाच्या गणेश मंडळाचे अध्यक्ष पोलीस पाटील मंडळाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते, बैठकीच्या सुरुवातीला उपस्थितांनी गणेशोत्सवातील विविध समस्या व उपाय योजनांबाबत सूचना मांडल्या

पोलिस उपअधीक्षक अमोल मांडवे म्हणाले, गणेशोत्सवात नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची मंडळांनी काळजी घ्यावी. लेझर लाईट आणि डीजेमुळे नागरिकांना त्रास झाल्यास ते त्याच क्षणी बंद केले जातील. उत्कृष्ट गणेश मंडळांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत.नागरिकांनी शांततेत गणेशोत्सव साजरा करावा. असे आवाहन केले

पोलिस निरीक्षक, सुभाष चव्हाण म्हणाले

गणेशोत्सव साजरा करताना पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करावा. गणेश मंडळे, नागरिक आणि प्रशासन यांच्यात योग्य समन्वय असणे आवश्यक असून. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी. विसर्जन मिरवणुकीत समाजाच्या भावना दुखावतील असे कृत्य करणाऱ्या मंडळावर त्याच वेळी कडक कारवाई केली जाईल. रस्त्यात मंडप उभारताना वाहतुकीला अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी. ध्वनिक्षेपक वापरण्यासाठी आवश्यक परवानगी घ्यावी.

यावेळी राजगुरूनगर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष माणिक होरे म्हणाले गणेशोत्सवातील गर्दीचा फायदा घेऊन मोबाईल व दागिने चोरीच्या घटना घडू नयेत यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली. तसेच विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर वीज तारांबाबत योग्य खबरदारी घेऊन आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात

निवासी नायब तहसीलदार चेतन मोरे म्हणाले

विसर्जनाच्या दिवशी मागील वर्षी चार ते पाच गणेश भक्तांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे गणेश मंडळांनी व भाविकांनी विशेष काळजी घ्यावी. प्रशासनाने घालून दिलेले नियम पाळूनच उत्सव साजरा करावा. महावितरण चे उपअभियंता उत्तम मंचरे यांनी महावितरण आणि गणेशोत्सवाचा जवळचा संबंध आहे. उत्सवाच्या काळात सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यक नियोजन केले जाईल. गणेश मंडळांनी अधिकृत वीज जोडणी घ्यावी. मंडळांना तात्पुरती नवीन वीज जोडणी उपलब्ध करून दिली जाईल. यावेळी विविध मान्यवर तसेच अनेक मंडळाचे प्रतिनिधी, पोलीस पाटील यांनी आवश्यक सूचना बैठकीत मांडल्या .सूत्रसंचालन मच्छिंद्र मुळुक यांनी केले. पोलिस हवालदार संतोष घोलप यांनी आभार मानले.

> गणेश मंडळांना नगरपरिषदेच्या माध्यमातून आवश्यक ते सहकार्य केले जाईल. राजगुरुनगर शहरातील गणेशोत्सव हा तालुक्यात महत्त्वाचा उत्सव आहे. सर्वांनी उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने चांगला उत्सव साजरा करावा.
>
> **-- मंगेश गुंडाळ, नगराध्यक्ष, राजगुरूनगर नगर परिषद**

> नगरपरिषदेच्या माध्यमातून गणेशोत्सवाची पूर्वतयारी करण्यात आली आहे. रस्त्यावर मंडप उभारताना नागरिकांच्या ये-जा करण्यास अडथळा निर्माण होणार नाही, याची मंडळांनी काळजी घ्यावी. देखावे कायदेशीर तसेच सांस्कृतिक स्वरूपाचे असावेत. चांगले सामाजिक उपक्रम राबवावेत. निर्माल्याची स्वतंत्र व्यवस्था केली जाणार असून त्यातच निर्माल्य टाकावे. विसर्जन मिरवणुका लवकर सुरू करून लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा. तसेच मूर्तीदान करण्यासाठी मंडळांनी पुढाकार घ्यावा.
>
> **-- अंबादास गर्कळ, मुख्याधिकारी, राजगुरूनगर नगर परिषद.**

## कोतवालीचे माजी पोलीस निरीक्षक विकास वाघ यांची बलात्काराच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

बलात्कारासह मारहाण, वाहनाचे नुकसान, शिवीगाळ आणि धमकीच्या गंभीर आरोपांनी गाजलेल्या खटल्यात अखेर कोतवाली पोलीस स्टेशनचे माजी पोलीस निरीक्षक विकास दौलतराव वाघ यांची सर्व आरोपांतून निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

अहिल्यानगर जिल्हा सत्र न्यायालयाने दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी हा निकाल दिला. आरोपीच्या बाजूने ड. राहुल (आर. एम.) पवार आणि ड. सागर टाक यांनी बाजू मांडली. न्यायालयाने अभियोजन पक्षाला आरोप संशयाच्या पलीकडे सिद्ध करता आले नसल्याचे नमूद करत आरोपीला निर्दोष मुक्त केले. न्यायालयीन नोंदीनुसार, फिर्यादी आणि आरोपी यांची २०१९ मध्ये ओळख झाली होती. पुढे दोघांमध्ये वाद निर्माण झाला. ११ फेब्रुवारी २०२१ रोजी दुपारी सिव्हिल हॉस्पिटलच्या मागील परिसरात दोघांमध्ये वाद व झटापट झाल्याची घटना घडली. त्याच दिवशी रात्री आरोपीने फिर्यादीला मिस्किन मळा परिसरात बोलावून तिच्यावर इच्छेविरुद्ध लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानंतर या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आणि तपासानंतर आरोपीविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले.

## नेवासा येथे पिढीजात परंपरेचे जतन,बैल पोळयाच्या निमित्ताने शेकडो बैलजोडयांचा मिरवणूकीत सहभाग

**नेवासा (समर्थ गांवकरी)**



नेवासा येथे बैल पोळयाच्या निमित्ताने जुन्या पिढीपासून आलेल्या परंपरेचे जतन करत आपल्या लाडक्या सर्जा राजाची मिरवणूक काढली.यावेळी झालेल्या बैलपोळा मिरवणुकीत वाड्या वस्त्यावरील शेतकऱ्यांनी आपल्या बैलजोडयांची सजावट करत मिरवणूकीत सहभाग नोंदवला.नेवासा येथील जुन्या पेठेतून सुरू झालेल्या बैल पोळा मिरवणुकीत शेकडो बैलजोड्या सहभागी झाल्या होत्या.यावर्षी उत्कृष्ट तीन जोड्यांना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी शेतकरी रामेश्वर कदम यांच्या मानाच्या बैल जोडीचे पूजन करण्यात येऊन त्यांचा टोपी उपरणे शाल देऊन नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले,लक्ष्मणराव जगताप, पोलीस निरीक्षक प्रतापराव दराडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी पोळा सणाच्या उत्सवात भर पडावी म्हणून बैल गाडी शर्यत कमिटी,पंच कमिटी, समर्पण फाऊंडेशनच्या वतीने प्रोत्साहनपर बक्षिसे ठेवण्यात आली होती.यासाठी उद्योजक प्रभाकरराव शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले नेवासा येथील जुन्या पेठेतील राममंदिर चौकातील चक्रधारी गणपती मंदिरापासून सायंकाळी ७ वाजता बैल जोड्यांच्या मिरवणुकीस प्रारंभ झाला.

गुलालाची उधळण करत बैलजोडयांना पूरणपोळीचा निवैद्य देऊन पूजन करण्यात आले.येथील मारुती चौकात असलेल्या मंदिरात नारळ वाढवून बैल जोड्यांच्या मालकांनी मारुतीरायाचे दर्शन घेतले.

## तामसा येथे सकल मराठा समाजाचा तीन तास चक्काजाम

**विखे पाटील यांच्या फोटोला जोडे मारून फोटो जाळला**

**टायर जाळून व घोषणाबाजी करून सरकारचा निषेध**

**तामसा (समर्थ गांवकरी)**



मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठींबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने तामसा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दि. ११ रोजी शुक्रवारी तीन तास चक्काजाम आंदोलन करुन सरकारचा जाहीर निषेध व्यक्त केला. आंदोलकांनी रस्त्यावर टायर जाळून सरकारचा जाहीर निषेध केलाच, शिवाय मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या फोटोला जोडेमारो आंदोलन करुन त्यांची प्रतिमा जाळून संताप व्यक्त केला.

मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मागणीसाठी धग तामसा या ग्रामीण भागापर्यंत पोहचली असून अनेक ठिकाणी अनेक प्रकारचे आंदोलन करुन सरकारचा जाहिर निषेध केला जात आहे. शुक्रवारी तामसा येथे सकल मराठा समाजाच्या वतीने रास्तारोको आंदोलनाची हाक दिली होती. तामसा, आष्टी भागातील शेकडो मराठा बांधवांनी सहभागी होऊन तामसा हदगाव, तामसा नांदेड, तामसा भोकर रस्त्यावरील वाहतूक बंद करुन तीन तास चक्काजाम आंदोलन केले. आंदोलनादरम्यान आक्रमक झालेल्या मराठा आंदोलकांनी रस्त्यावर टायर जाळून तसेच मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या फोटोला जोडे मारून तीव्र निषेध व्यक्त केला. एवढ्यावरच हे आंदोलक थांबले नसून त्यांनी विखे पाटलांचा फोटो जाळून त्यांचेविरोधात घोषणाबाजी करून संताप व्यक्त केला. सुमारे तीन तास चाललेल्या या रास्तारोको आंदोलनामुळे वाहतूक ठप्प झाली. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. परिणामी जनजीवन विस्कळीत झाले होते. आंदोलनस्थळी सकल मराठा समाजाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सरकारवर टीका करत आरक्षण देण्याची भूमिका भाषणातून मांडली. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तामसा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दंगल नियंत्रक पथकाला पाचरण करण्यात आले होते. सकल मराठा समाजाचा रास्तारोको आंदोलन शांततेत पार पडले.

## जायनावाडीत पारंपरिक पद्धतीने बैलपोळा उत्साहात साजरा

**ढोल-ताशांच्या गजरात बळीराजाची मिरवणूक; मंदिरांना प्रदक्षिणा घालून बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य**



**एकदरे (समर्थ गांवकरी)**

मातीशी नाते,कष्टाची शान,बैलांमुळे फुलते शेतकऱ्याचे रान,घामाच्या थेंबांना मिळते मान,

पोळ्याच्या सणाने वाढतो बळीराजाचा अभिमान अकोले तालुक्यातील अतिदुर्गम भागातील जायनावाडी,एकदरे,आढळा परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाही पारंपरिक आदिवासी पद्धतीने बैलपोळा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. शेतकऱ्यांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान असलेल्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी गावकऱ्यांनी उत्साहाने पोळा साजरा केला.यंदाच्या पावसाळ्यात शेतकरी राजा भात लागवड करून पावसाच्या प्रतीक्षेत होता.मात्र वरुणराजाने वेळेवर दमदार हजेरी लावल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या.शेतात भाताची रोपे डोलू लागल्याने आणि शेतीच्या कामांना वेग आल्याने यंदाचा बैलपोळा शेतकऱ्यांसाठी विशेष आनंदाचा ठरला.पोळ्यानिमित्त शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना सजवून त्यांची पूजा केली.बैलांच्या शिंगांना रंगरंगोटी,अंगावर विविध रंगांची नक्षी काढून तसेच बाशिंगे बनवून झुली व विविध सजावटीच्या साहित्याने बैलांना आकर्षक रूप देण्यात आले.यानंतर ढोल-ताशांच्या गजरात बळीराजाची मिरवणूक गावातून काढण्यात आली.पारंपरिक वाद्यांच्या तालावर ग्रामस्थ आणि शेतकरी मोठ्या उत्साहाने मिरवणुकीत सहभागी झाले.मिरवणूक भैरवनाथ मंदिरात पोहोचल्यानंतर मंदिराला पाच फेऱ्या मारून सलामी देण्यात आली.

## कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव-ने येथे शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रम संपन्न

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव-ने, ता. शेवगाव येथे दिनांक ८ व ९ सप्टेंबर २०२६ रोजी शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शेती मधील आधुनिक तंत्रज्ञान बद्दल केव्हीक शास्त्रज्ञानी व जिल्ह्यातील प्रयोगशील व प्रगतशील शेतकऱ्यांनी मार्गदर्शन केले.

संस्थेचे अध्यक्ष मा. आ. डॉ. नरेंद्र घुले पाटील, मा. आ. श्री. चंद्रशेखर घुले पाटील तसेच डॉ. क्षितीज घुले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे कामकाज सुरू आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव-नेचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एस. एस. कौशिक यांच्या हस्ते झाले.

यावेळी शेतकऱ्यांना विविध आधुनिक कृषि तंत्रज्ञानाबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. कमी जागेत जास्त नफा देणारी संरक्षित शेती या विषयावर प्रगतिशील शेतकरी श्री. हर्षवर्धन ताठे, चितळी यांनी मार्गदर्शन केले. कांदा पिकामध्ये एकरी ३० टन उत्पादन या विषयावर प्रगतिशील शेतकरी श्री. सर्फराज सय्यद यांनी आपले अनुभव व उत्पादन तंत्रज्ञान शेतकऱ्यांसमोर मांडले. चांगल्या बियाणाची निवड, मल्चिंग-बेड-ठिबक सिंचन व लागवड पद्धतीमध्ये बदल करून काटेकोर पद्धतीने कांदा शेती केल्यास एकरी ४५ टन पर्यंत उत्पादन येऊ शकते याची खात्री श्री सर्फराज सय्यद यांनी दिली. त्यांनी स्वतः एकरी ३३ टन गत हंगामात उत्पादन घेतलेले आहे.

ऊस शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) तंत्रज्ञानाचा वापर हा आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित विषय असून तो काळाची गरज ठरत आहे. या विषयावर फायलो ॲग्रीटेक चे तंत्रज्ञानचे विक्री व विपणन राज्य प्रमुख श्री. विशालकुमार मिरजे यांनी ऊस शेतीमध्ये ए.आय. तंत्रज्ञान का आवश्यक आहे त्याचे फायदे व कार्यपद्धती याबाबत मार्गदर्शन केले. तसेच सेंद्रिय भाजीपाला : संधी व मार्केटिंग या विषयावर सौ. कल्याणी मुरदारे यांनी माहिती दिली.

नैसर्गिक व सेंद्रिय शेती तसेच विविध पिकांमधील आधुनिक तंत्रज्ञान या विषयावर केव्हीके दहिगाव-ने चे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एस. एस. कौशिक यांनी मार्गदर्शन केले. आधुनिक कृषि यंत्रे व औजारे, काटेकोर पाणी व्यवस्थापन आणि सूक्ष्म सिंचन यावर विषय विशेषज्ञ (कृषि अभियांत्रिकी) इंजी. राहुल पाटील यांनी मार्गदर्शन केले. फळपिकांमध्ये सघन व अतिसघन पद्धतीने लागवड तंत्रज्ञान या विषयावर विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या ) श्री. एन. बी. दहातोंडे यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली.

कार्यक्रमांतर्गत कृषि विज्ञान केंद्राच्या



प्रक्षेत्रास भेट देऊन विविध प्रात्यक्षिकांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. ही प्रक्षेत्र भेट श्री. प्रकाश हिंगे, प्रक्षेत्र व्यवस्थापक यांनी घडवून आणली.

आत्मा अहिल्यानगर यांच्या प्रायोजकत्वाखाली हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी आत्मा, अहिल्यानगरचे प्रकल्प संचालक श्री. प्रदीप लाटे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे नियोजन श्री. सचिन बडधे, कृषि विस्तार विभाग प्रमुख यांनी केले, तर श्री. एन. बी. निबे यांनी आभार मानले.कार्यक्रमास परिसरातील प्रगतिशील शेतकरी श्री. बाळासाहेब मरकड, श्री. मिलिंद नाना कुलकर्णी, श्री. अभिजित घुले, श्री. विश्वास कर्डिले, श्री. गणेश वाबळे हे उपस्थित होते. आधुनिक तंत्रज्ञान, शेतकरी अनुभव आणि शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन यांचा संगम घडवून आणणारा हा सुसंवाद कार्यक्रम शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### नगर शहरात करिअर अकॅडमी चालकाकडून विद्यार्थिनीचा विनयभंग

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पोलीस भरतीचे प्रशिक्षण घेणार्या एका २१ वर्षीय तरुणीचा अकॅडमी चालकाने विनयभंग केल्याची संतापजनक घटना अहिल्यानगरमध्ये घडली आहे.

शिवरक्षक करिअर अकॅडमीचा चालक योद्धा राजे पवार याच्याविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

बीड जिल्ह्यातील बोरखेड येथील रहिवासी असलेली २१ वर्षीय विद्यार्थिनी अहिल्यानगरमधील शिवरक्षक करिअर अकॅडमीमध्ये पोलीस भरतीचे प्रशिक्षण घेत होती. ती याच संस्थेच्या वसतिगृहात वास्तव्यास होती. दरम्यान, १७ जुलै ते ३ सप्टेंबर या कालावधीत संशयित आरोपी योद्धा राजे पवार याने तरुणीला कार्यालयात बोलावून तिच्याशी गैरवर्तन केले. त्याने तिच्या अंगावर हात टाकून लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. हा प्रकार कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकीही आरोपीने दिली. घाबरलेल्या तरुणीने सुरुवातीला नेकनूर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. त्यानंतर ही तक्रार तोफखाना पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आली.

या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी संशयित आरोपी योद्धा पवार याच्यावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.

या गंभीर प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे करत आहेत.

### गणेशोत्सवासाठी काही दिवस शिल्लक; गणेशमूर्तींवर अखेरचा हात फिरवताना कारागीर



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

गणेशोत्सवाचे दिवस आता अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले आहेत. त्यामुळे गणेशमूर्ती तयार करण्याच्या कामाला वेग आला असून, शहरातील मूर्तिकार गणेशमूर्तींना अंतिम रूप देण्यात व्यस्त आहेत.

आकर्षक रंगसंगती, नाजूक कलाकुसर आणि बारकावे साधत कारागीर बाप्पांच्या मूर्तींवर अखेरचा हात फिरवताना दिसत आहेत. गणेशमूर्तींना अंतिम रूप देतानाचे हे दृश्य.

### जामखेड तालुक्यातील खर्डा येथे एक जणांचा दिवसाढवळ्या निघ्रृण खून




जामखेडे (समर्थ गांवकरी)

गुन्हेगारी प्रवृत्ती वाढीस लागली आहे.. नेमके समाज.. पोलीस. कायदा.. कोठे कमी पडत आहे.. सुन्न करणारी घटना घडली आहे. जामखेड तालुक्यातील ऐतिहासिक खर्डा गाव लगत सीताराम गडाच्या पायथ्याशी अज्ञात टोळक्याने एका ४० वर्षीय तरुणाच्या डोळ्यात मिरची पावडर टाकून त्याच्यावर कोयत्याने सपासप वार करून त्याची निर्घृण हत्या केली. भरदिवसा घडलेल्या या थरारक व निघृण हत्येच्या घटनेने खर्डा परिसर हादरून गेला आहे. या दुर्दैवी व खळबळजनक घटनेत मृत्यू पावलेल्या तरुणाचे नाव तानाजी भास्कर बोराडे (वय ४०), रा. माळीवाडा, ता. भूम असे आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आज दि. ११ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास यातील मयत तानाजी बोराडे हे सीताराम गडाच्या पायथ्याशी असताना स्कुटीवरून आलेल्या ३ ते ४ जणांच्या टोळक्याने त्यांना गाठले. काही समजण्याच्या आतच हल्लेखोरांनी आधी त्यांच्या डोळ्यात मिरची पावडर फेकली. बोराडे हे असहाय्य होताच त्यांच्यावर कोयत्याने प्राणघातक व धारदार कोयत्याने वार केले. तानाजी बोराडे हे रक्ताच्या थारोळ्यात हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले. घटनेची माहिती मिळताच खर्डा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षकृ उज्वलसिंह राजपूत हे पथकासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी गांभीर जखमी झालेल्या बोराटे यांना रूग्णवाहिकेतून जामखेड येथील ग्रामीण रूग्णालयात उपचारासाठी रवाना केले. मात्र, रूग्णालयात पोहोचण्यापूर्वीच वाटेत त्यांचा मृत्यू झाला असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले. घटनेचे गांभीर्य ओळखून सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना घटनेची माहिती दिली असून, पुरावे गोळा करण्यासाठी फॉरेन्सिक (न्यायवैद्यक) टीमला पाचारण केले आहे. हा खून कोणत्या कारणातून झाला याबाबतचे गूढ अद्याप कायम आहे. पोलीस सर्व सर्व बाजूंनी तपास करत असून, फरार आरोपींचा माग काढण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. पुढील तपास एपीआय उज्वलसिंह राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली खर्डा पोलीस करत आहेत.

# पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावरील एकेरी टीका

## विखे समर्थकांचा जरांगेना इशारा



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखालील समितीने वर्षभर सातत्याने प्रयत्न करून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. मनोज जरांगे-पाटील यांच्याशी संवाद साधून त्यांच्या मागण्यांवर शासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. अशा परिस्थितीत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर एकेरी भाषेत टीका करणे मराठा समाज खपवून घेणार नाही, असा इशारा शिर्डीचे प्रथम नगराध्यक्ष कैलासबापू कोते यांनी दिला.

मराठा समाजाच्या मागण्यांसाठी सरकारने घेतलेल्या निर्णयांचा उल्लेख करत कोते म्हणाले, मराठा समाजाच्या मागण्यांचा विचार करण्यासाठी उपसमितीने वर्षभर मेहनत घेतली. न्यायालयीन चौकटीत निर्णय टिकावेत, यासाठी कायदेशीर बाबी तपासून कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे प्रश्न सुटण्याच्या निर्णायक टप्प्यावर असताना आंदोलन ताणत नेण्यापेक्षा संवादातून मार्ग काढणे आवश्यक आहे.

निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीने शोधलेल्या ५८ लाख कुणबी नोंदी ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रत्येक जिल्ह्यात कुणबी प्रमाणपत्रातील अडचणी दूर करण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आतापर्यंत सुमारे ३.५ लाख कुणबी प्रमाणपत्रांचे वितरण झाल्याचेही शासनाने स्पष्ट केले आहे. वंशावळ व कायदेशीर नियमांचे पालन करूनच प्रमाणपत्रे देण्याची भूमिका सरकारने घेतली आहे.

याशिवाय मराठा, कुणबी आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सवलती, वसतिगृह निर्वाह भत्ता, परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण याबाबत चार स्वतंत्र शासन निर्णय जारी करण्यात आले आहेत. मराठा समाजाच्या मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष केले, असे म्हणणे योग्य नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री विखे पाटील यांनी या प्रश्नावर सातत्याने भूमिका घेतली आहे. घटनात्मक पदांवर असलेल्या आणि ज्येष्ठ नेत्यांवर खालच्या पातळीवर जाऊन टीका करण्याची भाषा थांबली पाहिजे, असे कोते यांनी स्पष्ट केले.

मराठा समाजाच्या प्रश्नासाठी आम्हीही रस्त्यावर उतरणारे लोक आहोत. त्यामुळे कुणीही आमच्या नेत्यांवर एकेरी भाषेत टीका करीत असेल तर त्याला जशास तसे उत्तर देता येते. मात्र मराठा समाजाला संघर्ष नव्हे तर आरक्षणाचा ठोस लाभ हवा आहे. म्हणून वातावरण बिघडविण्याऐवजी संवादातून प्रश्न सोडविणे आवश्यक आहे, असे कोते म्हणाले.

फडणवीस सरकारने मराठा समाजाच्या प्रश्नावर घेतलेल्या निर्णयांची जाणीव समाजाला आहे. त्यामुळे सध्या सुरू असलेले आंदोलन नेमके मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आहे की महायुती सरकार विरोधातील राजकीय संघर्षासाठी, असा प्रश्न सामान्य मराठा समाजामध्ये निर्माण होऊ लागला आहे, असा दावा कोते यांनी केला.

जरांगे पाटील यांच्या अनेक मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय घेतले आहेत. सरकारने एक पाऊल पुढे टाकले आहे. आता जरांगे पाटील यांनीही दोन पावले मागे येऊन संवादाचा मार्ग स्वीकारावा. तुटेपर्यंत ताणण्याची भूमिका मराठा समाजाच्या हिताची नाही. नेत्यांवरील एकेरी टीका तातडीने थांबवावी; अन्यथा मराठा समाज आपल्याबरोबर राहणार नाही, असा स्पष्ट इशारा कैलासबापू कोते यांनी दिला.

## भाळवणीजवळ अपघातात दाम्पत्यासह दोन मुले ठार



### कल्याण महामार्गावर पहाटे टेम्पोची कारला धडक

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

भरधाव टेम्पोने कारला धडक दिल्याने झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाला. अहिल्यानगरमध्ये आजारी नातेवाईकास भेटण्यासाठी चौघे मुंबईहून येत होते. गुरुवारी पहाटे अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर भाळवणीनजीक हा अपघात झाला.

शकील मोहम्मद शेख (वय ४५), सलमा शकील शेख, (वय ४२) इक्बाल शकील शेख (वय २३) आणि सुमैय्या शकील शेख (वय १८, सर्व रा. मालवण, मुंबई) अशी मृत चौघांची नावे आहेत.

शकील मोहम्मद शेख हे कुटुंबासह अहिल्यानगर येथील आजारी असणाऱ्या नातेवाईकांना भेटण्यासाठी वॅगनर कारने (एमएच ४७ सीके १३०८) बुधवारी (दि.९) रात्री मुंबईहून निघाले. पहाटे दोनच्या सुमारास भाळवणी येथील हॉटेल संदीपसमोर समोरून आलेल्या भरधाव टेम्पोने (एमएच १६, सीडी २७४७) ने कारला जोराची धडक दिली. या धडकेत कारमधील शकील मोहम्मद, सलमा शकील शेखइक्बाल शकील शेख आणि सुमैय्या शकील शेख जागीच ठार झाले. मृत पावलेल्या शेख कुटुंबातील चौघांचेही मृतदेह पारनेर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदना साठी पाठवण्यात आले होते,पारनेर ग्रामीण रुग्णालयात उत्तरीय तपासणी करण्यात आली. उत्तरिय तपासणीनंतर तपासणीनंतर चौघांनाही मृत घोषित करण्यात आले.मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले.

अपघातानंतर टेम्पोचालक पसार झाला. मृताचे नगरमधील नातेवाईक अल्ताफ शब्बीर शेख (रा. बाबळे कॉलनी, मुकुंदनगर) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. फरार चालकाचा शोध: अपघातानंतर आयशर टेम्पो चालक घटनास्थळावरून वाहन घेऊन पसार झाला होता. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध निष्काळजीपणा आणि भरधाव वेगात वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याबद्दल (भारतीय न्याय संहिता व मोटार वाहन कायद्यांतर्गत) गुन्हा दाखल केला असून त्याचा शोध घेण्यासाठी पथके रवाना केली आहेत.पुढील तपास पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे मार्गदर्शनाखाली पारनेर पोलीस करत आहेत

## बँक कर्मचाऱ्यांचा सरकारविरोधात एल्गार; पाच दिवसीय आठवड्याच्या मागणीसाठी देशव्यापी संप!

संगमनेर (समर्थ गांवकरी)



बँकिंग क्षेत्रात पाच दिवसीय आठवडा लागू करण्याच्या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांसाठी देशभरातील सुमारे १० लाख बँक कर्मचारी आणि अधिकारी यांनी शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी एकदिवसीय संप पुकारला. या संपामुळे देशभरातील बँकिंग सेवा मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. संगमनेर शहरातील राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखाही संपामुळे बंद ठेवण्यात आल्या होत्या. शहरातील बँक कर्मचारी भारतीय स्टेट बँक, जाणता राजा मार्ग शाखेसमोर मोठ्या संख्येने एकत्र आले होते.

या निदर्शनात संगमनेरसोबतच अकोले, राहाता, कोपरगाव, श्रीरामपूर आणि राहुरी तालुक्यातील बँक कर्मचारी सहभागी झाले. यावेळी सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. पाच दिवसीय आठवडा लागू करण्याच्या मागणीसाठी कर्मचाऱ्यांनी सरकारचे लक्ष वेधत आक्रमक भूमिका मांडली. निदर्शनानंतर बँक कर्मचाऱ्यांनी शहरातून मोर्चा काढला. मोर्चाची सांगता छत्रपती शिवाजी महाराज तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली.

यावेळी वैभव कदम, हर्षद पाबळकर, अरविंद कचरे, बालाजी बोरुडे, ध्वनित शिंदे, चेतन पाटील, नवाज देशमुख, विनल रजनी आदींनी मार्गदर्शन केले. पाच दिवसीय आठवड्याची मागणी तातडीने मान्य करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. सरकारने येत्या काळात ही मागणी मान्य केली नाही, तर बँक कर्मचाऱ्यांचा संघर्ष आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला. तसेच दि. २८ ते ३० सप्टेंबर २०२६ रोजी होणारा संपही यशस्वी करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

## पावसा अभावी वाया गेलेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत नुकसान भरपाई द्या : ग्राहक पंचायत

अकोले (समर्थ गांवकरी)



अकोले आदिवासी तालुक्यात यंदाच्या पावसाळ्यात तालुक्यात बऱ्याच भागात पर्जन्यमान कमी झाल्याने भात, सोयाबीन, बाजरी, भुईमुग, मका, कडधान्य पिके सुकुन, जळुन, करपुन चालली आहे. पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत नुकसान भरपाई मिळण्याबाबतचे निवेदन निवासी नायब तहसिलदार किसन लोहरे यांना दिल्याची माहिती अकोले तालुका व जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छींद्र मंडलीक, माधवराव तिटमे, सचिव राम रूद्रे यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की तालुक्यातील शेतकरी दररोज आभाळाकडे पाहून पाऊस आता होईल, आज होईल - महिना दिडमहिना झाला असुन दुष्काळ-सदृश परिस्थिती निर्माण झाली असुन आलेली पिके पावसानेही दडी मारल्याने पिक पाहाणीची परिस्थिती गंभीर बनत चालली आहे.

अकोले तालुक्यात आदिवासी भागात अतिवृष्टी झाली तिथेही भात पिके व इतर पिके आता पावसा-अभावी सुकुन, जळून, करपून चालली आहे. पावसाअभावी शेतकऱ्यांची अत्यंत गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असुन शेतकरी, पशुधन, व सर्व सामान्य शेतकरी नागरिकांना तातडीने आर्थिक मदत व दिलासा द्या.

## पाणी टंचाई निवारणासाठी संवेदनशीलतेने व समन्वयाने काम करण्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे निर्देश

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पावसा अभावी शेती तसेच पिण्याच्या पाण्याची परिस्थिती गंभीर होत असताना प्रशासनातील प्रत्येक विभागाने संवेदनशीलता आणि समन्वय ठेवून काम करावे. टंचाईग्रस्त गावांच्या समस्या जाणून घेण्यासाठी तहसीलदार, प्रांताधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांनी गावोगावी प्रत्यक्ष दौरे करून नागरिकांच्या अडचणींचे तातडीने निराकरण करावे. योजनांचे काम केवळ नियम अथवा प्रक्रियेच्या अडचणीमुळे प्रलंबित ठेवण्याऐवजी त्यावर व्यवहार्य पर्याय सुचवावेत, असे निर्देश जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

पाथर्डी नगरपरिषदेच्या कार्यालयात पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पाथर्डी व शेवगाव तालुक्यातील टंचाई परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. यावेळी आमदार मोनिका राजळे, नगराध्यक्ष अभय आव्हाड, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्यासह महसूल, जिल्हा परिषद, पंचायत समिती, जलसंपदा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पशुसंवर्धन आदी विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

पाणीपुरवठ्याचे एकत्रित नियोजन करण्याच्या सूचना

पाथर्डी शहर तसेच तालुक्यातील अनेक गावे विविध पाणीपुरवठा योजनांवर अवलंबून आहेत. शहराची पाण्याची गरज आणि ग्रामीण भागातील गावांची आवश्यकता लक्षात घेऊन उपलब्ध पाणीसाठ्याचे एकत्रित व प्रभावी नियोजन करावे, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

# बैलपोळा साजरा तर झाला,पण शेतकऱ्यांच्या डोळ्यात पावसाची आस

## दुष्काळाच्या सावटाने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंता

टाकळी ढोकेश्वर(समर्थ गांवकरी)

शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा सण असलेला श्रावणी बैलपोळा टाकळी ढोकेश्वर गटातसह नांदूर पठार येथे उत्साहात साजरा करण्यात आला. मात्र पावसाने अचानक दडी मारल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये मोठी चिंता आणि नाराजीचे वातावरण पाहायला मिळाले.

वर्षभर शेतात काबाडकष्ट करणाऱ्या आणि शेतकऱ्याच्या संसाराचा अविभाज्य भाग असलेल्या बैलांची शेतकऱ्यांनी विधिवत पूजा केली. बैलांना सजवून त्यांची मिरवणूक काढत पोळा सणाची परंपरा जपण्यात आली. मात्र यंदाच्या पोळ्यावर दुष्काळाचे सावट स्पष्टपणे जाणवत होते.

सोयाबीन हे प्रमुख पीक असून त्यासोबत बाजरी, मूग, वाल आदी पिकांची पेरणी करण्यात आली आहे. मात्र पावसाने पाठ फिरवल्याने पिकांची अवस्था चिंताजनक झाली आहे. पेरणीसाठी अनेक शेतकऱ्यांनी उसनवारी करून पैसे उभे केले आहेत. आता पाऊसच झाला नाही, तर घेतलेले पैसे कसे फेडायचे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.



जो बैल वर्षभर काबाडकष्ट करतो, त्याला आम्ही पोटच्या मुलाप्रमाणे सांभाळतो. त्यामुळे त्याचा सण आम्ही साजरा करणारच; मात्र निसर्गाने साथ दिली नाही तर शेतकऱ्याचे पुढे काय होणार, याची चिंता आहे, अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, शासनाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन जनावरांच्या चारा व पाण्याची तातडीने व्यवस्था करावी तसेच परिसरात दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी एकमुखी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे नेते रविंद्र राजदेव यांच्यासह शेतकरी सखाराम आग्रे, विठ्ठल आग्रे, प्रकाश राजदेव, नवनाथ पाटील घोलप, योगेश जाधव, नारायण राजदेव, नारायण चौधरी, अरुण आग्रे, गणेश देशमाने, भास्कर चौधरी, बाळू भांबरे, शंकर आग्रे, मुरलीधर उमप, गंगाधर आग्रे, आकाश महाराज घोलप, बाबाजी देशमाने, भानुदास आग्रे, सोपान राजदेव, पोपट राजदेव, अमोल गाडे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

### शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार : रविंद्र राजदेव...

बैलपोळा हा शेतकऱ्यांच्या भावनेशी जोडलेला सण आहे. शेतकरी आपल्या बैलाला पोटच्या मुलाप्रमाणे जपतो. यंदा पावसाने ओढ दिल्यामुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट आले आहे. शासनाने तातडीने परिस्थितीची पाहणी करून जनावरांच्या चारा-पाण्याची व्यवस्था करावी. तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दुष्काळ जाहीर करण्याबाबत तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना मदत करावी. या कठीण काळात मी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. जर शासनाने लवकरात लवकर शेतकऱ्यांवर ओढवलेल्या संकट परिस्थितीची पाहणी करून योग्य निर्णय घेतला नाही तर सर्व शेतकऱ्यांना घेऊन गुरा-ढोरासहित तहसील कार्यालयात आंदोलन करू.

**- रविंद्र राजदेव**
**नेते, टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गट**